सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222
दूरध्वनी : 0253-2231479 फॅक्स :2231716
संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac
ज्ञानगंगा घरोघरी
परीक्षा व नोंदणी विभाग

जा.क्र. : पनिका/2017/ दिनांक : 30.11.2017.

शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील पूर्वतयारी शिक्षणक्रम जून-सप्टेंबर 2017 तुकडीच्या ऑनलाईन परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रथम वर्ष प्रवेशाबाबत महत्वाच्या सूचना

(प्रकटन-तेरावे)

विद्यार्थी मित्रहो,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पूर्वतयारी शिक्षणक्रम **जून-सप्टेंबर 2017 तुकडीच्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा दिनांक** 12 ते 14 नोव्हेंबर 2017 या **तारखेला झालेली आहे. ह्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल आपले प्रथमतः अभिनंदन.**

संबंधित विद्यार्थ्यांसाठी ह्याच सत्रातील प्रथम वर्ष बी.ए. आणि बी.कॉम., वृत्तपत्रविद्या पदविका आणि पदवी (बीए एमसीजे), डीएलटी, बी.एस्सी.एल.टी., इत्यादी शिक्षणक्रमाला प्रवेश ऑनलाईन आपणांस घेता येईल. सदरची सोय ही पूर्वतयारी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ही विशेष बाब म्हणून उपलब्ध करण्यात येत आहे.

प्रवेशाचा कालावधी **दिनांक 15.11.2017 ते 30.11.2017 विना विलंब शुल्क उपलब्ध करून दिलेला होता. मात्र सदरची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया होत असताना बँक आणि सॉफ्टवेअरमधील अडचण येत असल्यामुळे बऱ्याच केंद्राकडून मुदत वाढीची मागणी आलेली आहे. तसेच विद्यापीठाला दिनांक 01 ते 03.12.2017 पर्यंत सुट्टी आल्यामुळे सदरची मुदतवाढ दिनांक 1 ते 5.12.2017 पर्यंत वाढविण्यात येत आहे.** ह्यानंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशाचा कालावाधीची मुदतवाढ होणार नाही. तसेच सर्व प्रवेश प्रक्रिया यानंतर आपोआप बंद होईल. ऑनलाईनव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे प्रवेश होणार नाहीत अथवा विद्यापीठाकडे मागणी देखील करू नये. तरी आपण लवकरात लवकर प्रवेश घ्यावा. प्रथम वर्षाला प्रवेश घेताना खालील बाबींची काळजी घ्यावी.

1. आपल्या पूर्वतयारी शिक्षणक्रमाच्या युजर आयडी आणि पासवर्डच्या आधारे अथवा कायमनोंदणी क्रमांकाद्वारे ऑनलाईन प्रवेशद्वाराच्या दुसऱ्या खिडकीतून प्रवेश घ्यावयाचा आहे. शक्य न झाल्यास नवीन युजरने प्रवेश घेतला तरी चालेल.
2. प्रवेशाच्यावेळी पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्याचे वय 18 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. ह्याव्यतिरिक्त 12 वी उत्तीर्ण अथवा प्रवेश पात्रता धारकास देखील प्रवेश करता येऊ शकेल.
3. प्रवेश घेताना आपण पात्रतेच्या ठिकाणी (इलिजीबीलिटी) आपणास मिळालेले पूर्वतयारीचे उत्तीर्ण असलेले गुणपत्रक स्कॅन करून टाकावयाचे आहे.
4. आपल्या स्वेच्छेनुसार कार्यरत असलेल्याच अभ्यासकेंद्रावर प्रवेश घ्यावा. अभ्यासकेंद्रावर माहिती घेतल्याशिवाय प्रवेश करू नये. अन्यथा चुकीच्या ठिकाणी ऑनलाईन प्रवेश होऊ शकतो.
5. प्रथम वर्षासाठी प्रवेश ऑनलाईन घेऊन शुल्क देखील नेटबँकिंगन्व्ये ऑनलाईन भरावयाचे आहे.

उपरोक्त बाबी प्रवेश घेताना काळजीपूर्वक वापरात आणाव्यात आणि प्रवेश तात्काळ करावा. आपणाकडून सहकार्याची अपेक्षा. धन्यवाद.

आपला विश्वासू,

प्रा.(डॉ.)अर्जुन पी. घाटुळे
परीक्षा नियंत्रक

NOTIFICATION REGARDING ADMISSION TO CANDIDATES TO UNDERGRADUATE PROGRAMS OF YCMOU ON THE BASIS OF PASSING PREPARATORY EXAMINATION (JUNE-SEPT 2017 BATCH)

(Notification 14th) **Dated – 30.11.2017**

Congratulations to the candidates who successfully completed the Preparatory Examinaitons (June-Sept 2017) batch for which examinations were conducted between Nov 12 to Nov 14 2017.

Such candidates can take admission to the Undergraduate degree and diploma Programs of the YCMOU (with Annual Pattern of examination like B.A., B.Com., BA in MCJ, DLT, BSc LT., etc) using ONLINE system of admission as per our instructions issued in our Notifications dated 14.112017. **THE PRESENT INSTRUCIONS ARE NOT APPLICABLE TO THEM.**

However the Preparatory Examination is a criteria for admission for various other academic programs of YCMOU for which Semester system is implemented (for example, V101:BSc (Hospitality and Tourism Studies), V102:BSc(Hospitality Studies and Catering Services), P131: BCA (Bachelor of Computer Applications), P133: BSc(Industrial Sciences), etc. The Univresity has received requests from such candidates for considering granting admission to such academic programs with semester system. However, there are technical issues and difficulties in granting admission to acadedmic programs with semester pattern, particularly as the End Examinations for these programs have been scheduled from 30 Dec 2017.

In order to address to the issues of the candidates who want to take admission to the UG degree or diploma programs with semester system, it has been decided, AS A VERY SPECIAL CASE, to grant admission based on candidates agreeing to the following conditions:

1. The candidates, if granted admissions, will not be able to take Semester I examinations scheduled for Dec 2017 due to technical difficulties. They may take examinations to the courses under Semester I in subsequent events like May 2018 or Nov 2018 as per the rules as REPEATER candidates and they shall pay the requisite examination fees as per rules.
2. The candidates shall complete the admission processes as OFF-LINE system of admission by coming to YCMOU Headquarters between 17 Nov 2017 to 05 Dec 2017 without late fees. No time extension to admission dates may be possible.
3. The candidate must fulfill the criteria of fulfilling age limit on 1 July 2017. No such age limit is required for candidate who have passed 12th level of schooling.
4. Candidates should submit the self attested copy of Preparatory mark sheet along with other required documents (proof of Date of Birth, Address Proof, etc)

The candidates are requested to note these instructions and take admission at their earliest.



(CONTROLLER OF EXAMS')

प्रत माहितीसाठी –

1. मा. कुलगुरू, यचममुविद्यापीठ, नाशिक, 2. मा. कुलसचिव, यचममुविद्यापीठ, नाशिक, 3. मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग,
4. मा. संचालक, विभागीय केंद्र - अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/कोल्हापूर/नांदेड., 5. मा. केंद्रसंयोजक यचममुवि, तत्सम अभ्यासकेंद्र यांना विनंती की आपल्या केंद्रावरील विद्यार्थ्यांचे प्रवेश उपरोक्तप्रमाणे वेळेत करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करावी ही विनंती.